RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ४९

दि. ११ जून २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# लातूरमध्ये दलित चळवळ थंडावली का?

## उपवर्गीकरणाच्या मुद्यावर शांतता का?

**लातूर/प्रतिनिधी : अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यभरात विविध दलित संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी मोर्चे, आंदोलने आणि निवेदने देऊन आपला विरोध नोंदवला आहे. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबादसह, बीड, परभणी, हिंगोली अनेक जिल्ह्यांमध्ये या विषयावर आंदोलनांची मालिका सुरू असताना लातूरमध्ये मात्र अद्याप मोठ्या प्रमाणावर मोर्चा किंवा सार्वजनिक आंदोलन झालेले दिसून आलेले नाही. त्यामुळे लातूरमधील दलित चळवळ थंडावली का?' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. उपवर्गीकरणाच्या विषयावर आंबेडकरी समाजातील अनेक संघटनांचे मत आहे की, अनुसूचित जातींच्या आरक्षणात अंतर्गत विभागणी केल्यास समाजात नवीन भेद निर्माण होऊ शकतात. काही संघटनांचा आरोप आहे की, या प्रक्रियेमुळे विविध दलित समाजांमध्ये अविश्वास आणि संघर्ष वाढण्याची शक्यता आहे.**

विशेषतः महार आणि मांग या दोन मोठ्या समाजघटकांमध्ये मतभेद निर्माण होण्याची भीती अनेक सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. त्यांच्या मते, सामाजिक न्यायाच्या नावाखाली राबवली जाणारी उपवर्गीकरणाची प्रक्रिया समाजाच्या एकात्मतेसाठी घातक ठरू शकते. त्यामुळे या विषयावर व्यापक चर्चा आणि सर्व घटकांची सहमती आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

दुसरीकडे, उपवर्गीकरणाचे समर्थक असे म्हणतात की अनुसूचित जातींमधील काही घटकांना आरक्षणाचा तुलनेने कमी लाभ मिळाला असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक आहे. त्यामुळे या विषयावर समाजात दोन भिन्न भूमिका समोर येत आहेत.




लातूर जिल्हा हा ऐतिहासिकदृष्ट्या आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला मानला जातो. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांवर येथे मोठ्या प्रमाणात जनआंदोलने उभी राहिल्याचा इतिहास आहे. अशा परिस्थितीत उपवर्गीकरणासारख्या संवेदनशील विषयावर अद्याप मोठे आंदोलन न झाल्याने अनेक कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू आहे.

काहींच्या मते, स्थानिक संघटना अजूनही आंदोलनाची रणनीती ठरवत आहेत, तर काहींच्या मते विविध गटांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने एकत्रित भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे आगामी काळात लातूरमध्येही या विषयावर मोठी चळवळ उभी राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, सामाजिक सलोखा आणि संविधानिक मूल्ये जपणे हे सर्व पक्ष आणि संघटनांचे कर्तव्य आहे. उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर मतभेद असू शकतात; मात्र कोणत्याही समाजघटकांमध्ये तेढ निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. समाजातील सर्व घटकांचा संवाद, चर्चा आणि लोकशाही मार्गाने भूमिका मांडणे हाच या प्रश्नावर तोडगा शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग ठरू शकतो.

## खरीप हंगाम २०२६: तूर, मूग, उडीद व ज्वारीच्या प्रमाणित बियाण्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** खरीप हंगाम २०२६ साठी विविध शासकीय योजनांतर्गत प्रमाणित बियाणे वितरणाची प्रक्रिया सुरू झाली असून, लातूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक महेशकुमार तिर्थकर यांनी शेतकऱ्यांना 'महाडीबीटी' प्रणालीद्वारे त्वरित अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियाना'अंतर्गत तूर, मूग आणि उडीद या पिकांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या योजनेतील तरतुदींनुसार पाच वर्षांच्या आतील वाणासाठी ६ हजार रुपये प्रति क्विंटल अनुदान, पाच ते दहा वर्षांच्या आतील वाणासाठी ३ रुपये प्रति क्विंटल अनुदान दिले जाईल. सन २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे केले जात आहे. याची दखल घेत, या योजनेतील एकूण लाभार्थ्यांपैकी किमान ३० टक्के निवड महिला शेतकऱ्यांची केली जाणार आहे.

या योजनेसाठी शेतकऱ्यांनी 'ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी'चा वापर करून महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा. लाभार्थी निवड 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच, आपल्या परिसरातील मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा उपकृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. अर्जदार शेतकऱ्यांना योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

## खरीप हंगामात तूर, मूग, उडीद बियाणे संच वाटपासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** खरीप हंगाम २०२६ अंतर्गत शासनाच्या विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर बियाणे संच (सीड किट) उपलब्ध करून देण्यात येणार असून, यासाठी महाडीबीटी प्रणालीवर अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' अंतर्गत तूर, मूग आणि उडीद या पिकांचे ४ किलो वजनाचे बियाणे आणि जैविक खताची पाकिटे पाच वर्षांच्या आतील वाणांसाठी वितरीत केली जाणार आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी 'ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी'चा वापर करून महाडीबीटी पोर्टलच्या (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin) अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक आहे.

या प्रक्रियेत 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड केली जाणार असून, सन २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष असल्याने एकूण लाभार्थी निवडीमध्ये किमान ३० टक्के महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या https://krishi.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा आपल्या क्षेत्रातील सहाय्यक, मंडळ किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक महेशकुमार तिर्थकर यांनी केले आहे. अर्जदार शेतकऱ्यांना योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

## ठाण्यात धक्कादायक घटना! रस्त्यावर थुंकल्याप्रकरणी हटकल्याच्या रागातून परप्रांतीय रिक्षाचालकाची वयोवृद्धाला मारहाण

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यात एका परप्रांतीय रिक्षाचालकाकडून वयोवृद्धाला मारहाण झाल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. सध्या सोशल मीडियावर या संदर्भातला एक व्हिडीओ व्हायरल होतोय. सदर प्रकरणामुळे ठाणे शहरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार सदर परप्रांतीय रिक्षाचालक हा रस्त्यावर पाण्याच्या गुळण्याकरून थुंकत होता. यावेळी रस्त्यावरून चालणाऱ्या एका वयोवृद्ध जोडप्यातील व्यक्तीने त्याला हटकले. सार्वजनिक ठिकाणी असं थुंकू नये आणि अस्वच्छता पसरवू नये अशी समज दिली. मात्र यागोष्टीचा परप्रांतीय रिक्षाचालकाला राग आला आणि त्याने वयोवृद्ध व्यक्तीसोबत वाद घालायला सुरुवात केली. हा वाद इतका वाढला की ओला रिक्षाचालकाने थेट वयोवृद्ध व्यक्तीला मारहाण केली. रिक्षाचालकाने वयोवृद्ध व्यक्तीच्या दिशेने मोठा दगड फेकला ज्यामुळे वयोवृद्ध व्यक्तीच्या पायाला दुखापत झाली. सदर गोष्टीची माहिती जेव्हा दोन्ही शिवसेनेच्या युवासैनिकांना समजली तेव्हा त्यांनी संबंधीत चालकाला शोधून काढण्यासाठी तातडीने हालचाली सुरु केल्या. अवघ्या काही तासात ओला चालकाचा शोध घेण्यात युवासैनिकांना यश आलं. यावेळी त्यांनी चालकाला पकडून त्याला शिवसेना स्टाईल चोप दिला. ओला चालकाला युवासैनिकांनी वर्तकनगर पोलिसांच्या स्वाधीन केलं आता पोलीस या प्रकरणी पुढील चौकशी करत आहेत. व्हायरल व्हिडीओ आणि घटनेच्या पार्श्वभूमीवर परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

## खाजगी ट्रॅव्हल्सच्या मनमानीला चाप लावा अन्यथा आंदोलन !!

### व्ही एस पँथर्स वाहतूक आघाडी चा इशारा...




**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार वाहतूक आघाडी चे शहराध्यक्ष शाहरुख मणियार यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हा अधिकारी कार्यालयात निवेदन देऊन लातूर शहरातील खाजगी ट्रॅव्हल्स च्या मनमानीला चाप लावण्याची मागणी करण्यात आली खाजगी ट्रॅव्हल्स वाले उन्हाळी आणि दिवाळी सुट्ट्यांमध्ये सामान्य नागरिकाकडून अवाकी सव्वा भाडे आकारत आहेत तसेच संध्याकाळी सहा वाजल्यापासून शहरात खाजगी ट्रॅव्हल्स येत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे त्यामुळे शहरातील वाहतूकदारांना अडचण होत आहे.

शहरातील मुख्य रस्त्यावर गाड्या उभ्या करून वाहतूक कोंडी करत आहेत यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अन्यथा व्हीएस पँथर्स तीव्र आंदोलन छेडेल याची गंभीरतेने दखल घेण्यात यावी असा इशारा यावेळी देण्यात आला या निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद किणीकर वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष शाहरुख मणियार शहर सचिव आयान पठाण अन्वर शेख मोहम्मद शेख आसिफ शेख युनियनचे गणेश कसबे रिहान सय्यद जुबेर सय्यद अजहर शेख शादुल शेख राजू मस्के अर्जुन कराड आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## अधिकमास यात्रेसाठी गेलेल्या भाविकांवर काळाचा घाला; पुरुषोत्तमपुरीत ५० भाविकांनी भरलेली बोट पलटली

बीड : देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम मंदिरासाठी प्रसिद्ध असलेल्या बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमास यात्रेदरम्यान एक मोठी दुर्घटना घडली आहे. गोदावरी नदीत भाविकांनी खचाखच भरलेली बोट अचानक पलटल्याने एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत अनेक भाविक थोडक्यात बचावले असले तरी १० ते १२ वर्षांचा एक मुलगा अद्याप बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे यात्रेच्या नियोजनावर आणि सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अधिकमास यात्रेसाठी आलेले सुमारे ५० भाविक नदी पार करण्यासाठी बोटीत बसले होते. मात्र, बोटीची क्षमता कमी असतानाही त्यात क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवण्यात आल्याचा आरोप भाविकांनी केला आहे. नदीच्या मध्यभागी पोहोचल्यानंतर बोटीचा तोल गेल्याने ती अचानक पलटली आणि क्षणार्धात सर्वजण पाण्यात फेकले गेले. या दुर्घटनेतून बचावलेल्या महिलांनी आपबिती सांगताना भीतीदायक क्षणांचा उल्लेख केला. ''काही क्षणांसाठी आम्ही पूर्णपणे पाण्याखाली गेलो होतो. आता आपण वाचणार नाही असे वाटत होते. लहान मुले, महिला आणि वृद्धांचा आक्रोश सुरू होता. काही जणांनी पोहत किनारा गाठला, तर काहींना स्थानिकांनी मदत केली,'' असे एका महिलेने सांगितले. घटनेनंतर नदीकाठावर एकच गोंधळ उडाला. भाविकांनी आपल्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी धावाधाव केली. बेपत्ता मुलाचा शोध घेण्यासाठी स्थानिक प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि ग्रामस्थांकडून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

भाविकांनी बोटधारकांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, यात्रेतील गर्दीचा फायदा घेत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवले जात होते. अनेक प्रवाशांकडे लाइफ जॅकेट नव्हते. बोटींवर कोणतीही सुरक्षा तपासणी होत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ''प्रवाशांची संख्या नियंत्रित करण्यासाठी कोणीही नव्हते. बोट भरल्यावरही आणखी लोकांना बसवण्यात आले. आम्ही विरोध केला, पण आमचे कोणी ऐकले नाही,'' अशी प्रतिक्रिया काही भाविकांनी दिली. सुदैवाने या दुर्घटनेत मोठी जीवितहानी झाली नाही. मात्र, नदीत पडलेल्या अनेक भाविकांना स्थानिक नागरिक आणि बचाव पथकांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. जर पाण्याचा प्रवाह अधिक वेगवान असता किंवा बचावकार्य उशिरा सुरू झाले असते, तर परिस्थिती आणखी गंभीर बनली असती, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

## सोलार पॅनल व कॉपर वायर चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश;१३ गुन्ह्यांची उकल, ₹१६.५९ लाखांचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून ग्रामीण भागातील सोलार प्रकल्प, शेतकऱ्यांच्या शेतातील सौरऊर्जा यंत्रणा, विद्युत केबल्स, कॉपर वायर तसेच औद्योगिक भागातील मौल्यवान विद्युत साहित्य चोरीच्या घटना घडल्या होत्या त्या पार्श्वभूमीवर लातूर पोलीस दलाने मालमत्तेविरुद्ध गुन्हे करणाऱ्या टोळ्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली होती. या मोहिमेला मोठे यश मिळवत स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी एका सराईत आंतरजिल्हा चोरट्या टोळीचा पर्दाफाश केला असून तब्बल १३ गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे.

पोलीस अधीक्षक लातूर श्री अमोल तांबे यांच्या सूचना व निर्देशान्वे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. बावकर यांच्या नेतृत्वाखाली मालमत्तेविरुद्ध गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध सुरू असताना दिनांक ९ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी पाच नंबर चौकात तात्काळ सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची ओळख १) बालाजी अरुण काळे (रा. सरमकुंडी फाटा, ता. वाशी, जि. धाराशिव)




२)आकाश उर्फ भैया नवनाथ पवार (रा. सुर्डी, ता. केज, जि. बीड, सध्या रा. शिराढोण पारधी पिढी, जि. धाराशिव)

अशी पटली. आरोपींच्या ताब्यातील टाटा व्हिस्टा कारची झडती घेतली असता वाहनातील पिशवीमध्ये तब्बल ₹११ लाख ९ हजार रुपयांची रोख रक्कम आढळून आली. एवढी मोठी रक्कम पाहून पोलिसांना संशय आल्याने आरोपींकडे सखोल चौकशी करण्यात आली.

पोलीसी खाक्या दाखवत आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे करण्यात आलेल्या चौकशीत आरोपींनी अनेक धक्कादायक खुलासे केले. त्यांनी आपल्या अन्य साथीदारांसह लातूर जिल्ह्यातील विविध भागांमध्ये सोलार पॅनल, कॉपर वायर, केबल वायर, विद्युत साहित्य तसेच बोअरवेल मोटारींच्या चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. चोरी केलेले साहित्य विविध ठिकाणी विकून त्यातून मिळालेली रक्कमच त्यांच्या ताब्यात सापडल्याचे निष्पन्न झाले.

तपासादरम्यान आरोपींनी अरुण उर्फ बल्ली बारीकराव काळे, पिंटू मच्छिंद्र काळे, सुनील बबन शिंदे आणि शाम उर्फ अनिल बबन शिंदे या साथीदारांची नावे सांगितली असून त्यांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार या टोळीने मुरुड, भादा, चाकूर, औसा, रेणापूर, उदगीर आणि एमआयडीसी लातूर परिसरात सोलार पॅनल, विद्युत केबल्स, कॉपर वायर व अन्य साहित्य चोरी करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा मिळविला होता. पोलिसांनी जिल्ह्याच्या गुन्हे अभिलेखांची पडताळणी केली असता आरोपींनी कबूल केलेल्या घटनांशी संबंधित एकूण १३ गुन्हे उघडकीस आले.

यामध्ये मुरुड पोलीस ठाण्याचे तीन, भादा पोलीस ठाण्याचे दोन, चाकूर पोलीस ठाण्याचे दोन, औसा पोलीस ठाण्याचे दोन, रेणापूर पोलीस ठाण्याचे दोन, एमआयडीसी पोलीस ठाण्याचा एक आणि उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचा एक गुन्हा समाविष्ट आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील सौरऊर्जा प्रकल्प व शेतकऱ्यांच्या शेतांमधील सोलार यंत्रणा लक्ष्य करून या टोळीने चोरीची मालिका सुरू ठेवली होती.

या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून चोरीच्या मालाच्या विक्रीतून मिळालेली ₹११,०९,०००/- रोख रक्कम, गुन्हे करण्यासाठी वापरण्यात आलेली टाटा व्हिस्टा कार किंमत ₹५,००,०००/-, तसेच हिरो एचएफ डिलक्स मोटारसायकल किंमत ₹५०,०००/- असा एकूण ₹१६,५९,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर आरोपींना अटक करून मुरुड पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ७३/२०२६ अन्वये पुढील कायदेशीर कारवाईसाठी हजर करण्यात आले आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून चोरीस गेलेल्या उर्वरित साहित्याचा मागोवा घेण्याचे काम सुरू आहे.

ही उल्लेखनीय कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, पोलीस अंमलदार संजय कांबळे, तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड,मोहन सुरवसे, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, युवराज गिरी, रियाज सौदागर, सिद्धेश्वर मदने राहुल कांबळे, गोविंद भोसले, अंजली गायकवाड, शैलेश सुडे, चंद्रकांत केंद्रे, संतोष खांडेकर आदींच्या पथकाने अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने पार पाडली.

## संपादकीय...

### तुकाराम मुंढे : बदल्यांचा विक्रम की प्रामाणिकतेची किंमत?

राज्य प्रशासनात काही अधिकारी त्यांच्या पदामुळे ओळखले जातात, तर काही त्यांच्या कामामुळे. आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे हे दुसऱ्या प्रकारातील अधिकारी आहेत. गेल्या २१ वर्षांच्या प्रशासकीय कारकिर्दीत तब्बल २५ वेळा झालेल्या त्यांच्या बदल्या हा केवळ एक आकडा नाही, तर प्रामाणिक, कठोर आणि तडजोड न करणाऱ्या प्रशासनशैलीची साक्ष आहे. सामान्यतः एखाद्या अधिकाऱ्याच्या वारंवार होणाऱ्या बदल्या या राजकीय किंवा प्रशासकीय अस्थिरतेचे प्रतीक मानल्या जातात. मात्र तुकाराम मुंढे यांच्या बाबतीत हे चित्र वेगळे दिसते. त्यांनी जिथे जिथे काम केले, तिथे नियमबाह्य व्यवहारांवर कठोर कारवाई केली आणि त्यामुळे अनेक हितसंबंधांना धक्का बसला. २५ मे २०२६ रोजी त्यांनी अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला. पदभार स्वीकारताच त्यांनी राज्यातील भेसळखोर, गुटखा माफिया आणि बेकायदेशीर औषध व्यवसायाविरोधात धडक मोहीम सुरू केली. अवघ्या काही दिवसांत त्यांच्या कार्यपद्धतीची राज्यभर चर्चा सुरू झाली. फक्त सात दिवसांच्या विशेष मोहिमेत १.५८ कोटी रुपयांहून अधिक किमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला जप्त करण्यात आला. ही कारवाई केवळ आकडेवारी नाही, तर अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अवैध साखळीवर घातलेला मोठा घाव आहे. या मोहिमेत २०३ ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. ८६ आस्थापना सील करण्यात आल्या आणि १०२ जणांना अटक करण्यात आली. प्रशासनाचा धाक निर्माण झाल्यास काय परिणाम होऊ शकतो, याचे हे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. छत्रपती संभाजीनगरमध्ये गुटख्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर करण्यात आलेली कारवाईही तितकीच महत्त्वाची ठरली. लाखो रुपयांचा माल आणि सुमारे ४१ लाख रुपये किमतीची वाहने जप्त करून प्रशासनाने माफियांना स्पष्ट संदेश दिला. अन्नभेसळ ही आजच्या काळातील सर्वात गंभीर सार्वजनिक आरोग्य समस्या बनली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंढे यांनी दूध, पनीर, खवा, तूप यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळीविरोधात मोहीम उघडली आहे. धाराशीवमध्ये २१५ किलो भेसळयुक्त खवा जप्त करण्यात आला, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये निकृष्ट दर्जाचे तूप पकडण्यात आले. या कारवायांमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. पुणे जिल्ह्यात रासायनिक प्रक्रिया करून पिकवलेले ८०० किलो आंबे जप्त करण्यात आले. ग्राहकांना आकर्षक दिसणारे फळ विकण्यासाठी वापरली जाणारी ही घातक पद्धत आरोग्यासाठी किती धोकादायक आहे, याची समाजाला पुन्हा जाणीव झाली. फरसाण आणि खाद्यपदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कृत्रिम व घातक रंगांवर करण्यात आलेली कारवाईही महत्त्वपूर्ण आहे. नफ्याच्या हव्यासापोटी नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या प्रवृत्तींना यामुळे आळा बसण्याची शक्यता आहे. औषध व्यवसायातील अनियमितता हा आणखी एक गंभीर विषय आहे. अनेक मेडिकल स्टोअर्समध्ये पात्र फार्मासिस्ट नसतानाही औषधांची विक्री होत असल्याचे प्रकार वेळोवेळी समोर येत असतात. तुकाराम मुंढे यांनी अशा दुकानांवर कठोर भूमिका घेत फार्मासिस्टची उपस्थिती बंधनकारक केली आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सना सील करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. बनावट कागदपत्रे, नियमबाह्य औषध विक्री आणि बेकायदेशीर साठेबाजी करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. यामुळे औषध व्यवसायातील पारदर्शकता वाढण्यास मदत होईल. विशेष म्हणजे त्यांनी केवळ कारवाईवर भर दिला नाही, तर नागरिकांच्या सहभागालाही प्राधान्य दिले आहे. थेट तक्रार व्यवस्था सुरू करून त्यांनी सामान्य नागरिकांना प्रशासनाचा भाग बनवले आहे. टोल-फ्री क्रमांक आणि ई-मेलद्वारे तक्रारी स्वीकारण्याची सुविधा ही लोकशाही प्रशासनाचे उत्तम उदाहरण आहे. नागरिक जागरूक झाले तरच भेसळखोरांविरुद्धची लढाई अधिक प्रभावी ठरू शकते. सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र ही त्यांची संकल्पना केवळ घोषवाक्य नाही. ती नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आखलेली व्यापक मोहीम आहे. तिचा परिणाम आगामी काळात अधिक स्पष्टपणे दिसून येईल. मात्र येथे एक प्रश्न उपस्थित होतो. अशा प्रकारे कठोर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या का होतात? प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशासकीय स्थैर्य मिळणे ही लोकशाही व्यवस्थेची गरज नाही का? जेव्हा एखादा अधिकारी भ्रष्टाचार, भेसळ आणि बेकायदेशीर साखळ्यांवर प्रहार करतो, तेव्हा अनेक शक्तिशाली हितसंबंध दुखावले जातात. त्यामुळे त्यांच्यावर विविध प्रकारचे दबाव येणे ही नवीन बाब नाही. तुकाराम मुंढे यांच्या कारकिर्दीतील बदल्यांकडे याच संदर्भात पाहण्याची गरज आहे. आज महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित अन्न, दर्जेदार औषधे आणि पारदर्शक प्रशासन हवे आहे. तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी हीच अपेक्षा प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्या कारवाईचे अंतिम यश केवळ प्रशासनावर नाही, तर समाजाच्या पाठिंब्यावरही अवलंबून आहे. प्रामाणिक अधिकाऱ्यांना पाठबळ देणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.

# समाजात पदांची निर्मिती शोभेची वस्तू नसून विकासासाठी आणि प्रबोधनासाठी असतात!

संविधान निर्मात्यांनी ओबीसींसाठी संविधानात तरतूद केलेली आहे त्याचा योग्य उपयोग समाजात नेतेगिरी करणाऱ्या ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाज जागृतीसाठी करावा.आदर्श ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा मुकुट परिधान करणाऱ्या अनेक सामाजिक संघटना,संस्था,विविध विकास मंच अनेक विविध प्रतिष्ठान असतील आणि संपूर्ण राज्यभरात हजारो पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली असेल यापैकी अनेक जण स्वतः लाच समाजाचे दिग्गज नेतृत्व आणि धडाकेबाज युवक नेतृत्व म्हणवून घेत असतील परंतु,कोणाच्याही नेतृत्वाखाली स्वतःच्या हक्काच्या गृह जिल्ह्यात हजारोंच्या संख्येने उद्योग व्यवसाय उभारणी करून तळागाळातील आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांना तसेच गरजू महिलांना आर्थिक उत्पनाचे साधन संसाधन म्हणून रोजगार निर्मिती केलेली नाही. ओबीसी,आरक्षण,जनगणना,संवैधानिक अधिकार,सत्ता,संपत्ती,ज्ञान आणि राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज जागृती मेळाव्यात हजारोंच्या संख्येने समाजाला एकत्रित केलेले नाही.

ओबीसी सुतार समाजात मोठ्या आवेशात नेतेगिरी करणाऱ्या स्वयंघोषित नेत्यांनी आणि जबाबदार पदाधिकाऱ्यांनी समाजात उद्योग व्यवसाय,ओबीसी,आणि राजकीय हिस्सेदारी संदर्भात सुतार समाजात समाज जागृती निर्माण करण्यासाठी अजिबात प्रयत्न केले नाहीत कारण समाज जागृत झाला तर या लोकांना उजळमाथ्याने मोठेपणा मात्र मिरवता येणार त्यासाठी बुद्धिवान लोकांनी जागरूक असावे जेणेकरून ओबीसी सुतार समाजाची दिशाभूल करण्यास कोणताही पुढारी धजावणार नाहीत.समाजात फक्त विशिष्ट लोकांचे वाढदिवस,सदिच्छा भेटीगाठीचे,आनंदाच्या क्षणांचे औचित्य साधून मात्र सोशल मीडियावर फोटोबाजी करून त्याखाली न विसरता ठळकपणे आवर्जून संबंधित पदांचा उल्लेख केला जातो अशाच पद्धतीने समाजात स्वयंघोषित पुढारी उदयास येतात हिच सत्य परिस्थिती आहे.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात अनेक वर्षांपासून मोठ्या रुबाबात नेतेगिरी करणाऱ्या कोणत्याही स्वयंघोषित दिग्गज नेत्यांनी आणि कोणत्याही स्वयंघोषित धडाकेबाज युवक नेत्यांनी आपापल्या खऱ्या खोट्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करून ओबीसी,आरक्षण,जनगणना,संविधान,सत्ता,संपत्ती,ज्ञान आणि राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केलेले नाहीत या व्यतिरिक्त कोणत्याही स्वयंघोषित समाज नेत्यांनी सुतार समाजात लाखोंच्या संख्येने उद्योग व्यवसाय उभारणी केलेली नाही शिवाय समाजाला संवैधानिक आधार आणि संवैधानिक अधिकार असलेले राजकीय प्रतिनिधित्व मिळवून दिले नाही.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील जबाबदार पदाधिकारी आणि सर्वच स्वयंघोषित नेत्यांनी समाज चिंतन करण्याची नितांत गरज आहे. सुतार समाजात फक्त नावासोबत सामाजिक पदभार जोडण्यासाठी नसतो हे आपण सर्वच मान्यवर जाणतो. सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित समजणारे सामाजिक पद आणि पदानुसार समाज प्रतिष्ठा,पदाच्या उंचीनुसार हक्काचे ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करण्याची समाजात क्षमता,पात्रता,प्रतिष्ठा ओबीसी सुतार समाजात समाज किंमत,प्रभाव,प्राबल्य,प्रभुत्व,समाजात प्रचंड समाजप्रिय असलेले,समाज अभ्यासक,थोर विचारवंत आणि कृतीशील,कार्यसम्राट,सुतार सम्राट,कर्तबगार,कर्तृत्ववान सामाजिक कार्यात तत्परता इत्यादी तर ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात सामाजिक वैचारिक तसेच नैतिकतेच्या आधारावर ओबीसी सुतार समाजात एकही बहाद्दर सामाजिक ते राजकीय पदाधिकारी सापडणार नाही हि ओबीसी सुतार समाजात सत्य परिस्थिती आहे.

ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील सर्वच सन्माननीय जबाबदार पदाधिकारी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली मग ते सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील पद तालुका पातळीवर असो अथवा जिल्हा पातळीवर असो किंवा,राज्य पातळीवर असो असावे फक्त नावासोबत पदभार,पदावली,एखाद्या पदाची नैतिक जबाबदारी स्वीकारलेली असेल अशा सर्वच बुद्धिवान,कर्तृत्ववान प्रत्येक जबाबदार सन्माननीय पदाधिकारी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली त्या त्या क्षेत्रातील त्या त्या भौगोलिक क्षेत्रातील ओबीसी सुतार समाज बांधवांना दरडोई किमान दहा ते पंधरा हजार तरी ओबीसी सुतार समाज बांधवांना ओबीसी संदर्भात समाज जागृती मेळाव्यात,आरक्षण,संविधान जागरूकता अभियान कार्यक्रमात,ओबीसी समाज आंदोलनात,ओबीसी मोर्चात किंवा,इतर अन्य ओबीसी संदर्भात सुतार समाज प्रबोधनात्मक,समाज आंदोलनात्मक कार्यक्रमात संबंधित नेतृत्वाखाली दरडोई किमान दहा ते पंधरा हजार ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करावं यासाठी मोठं धाडस करावं.

विश्वकर्मीय सुतार समाजात एवढा मोठा प्रचंड समाज ताफा,संपूर्ण राज्यातील जबाबदार आणि कृतिशील लाखोंच्या संख्येने कार्यकर्ते आणि हजारोंच्या संख्येने पदाधिकाऱ्यांची प्रचंड शक्ती,पाठबळ सामाजिक संघटनांकडे कार्यरत असतांना ओबीसी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमात पिछाडीवर कशासाठी हा प्रश्न मात्र समाजात अनुत्तरित आहे.ओबीसी सुतार समाज सुशिक्षित,उच्चशिक्षित,बुद्धिवान आहे याची कल्पना सर्वानाच आहे. शिवाय अनेक समाज मान्यवर समाजात समाज प्रतिष्ठित,प्रतिभावंत,प्रभावशाली असतील.समाजात अनेक मान्यवरांनी स्वतःच्या नावासोबत समाज नेता,समाज नेतृत्व आणि युवक नेतृत्व अशी सन्मानित पदाची बिरुदावली सुद्धा जोडण्यात आलेली असेलच.याव्यतिरिक्त समाजात सुतार समाजाची शान,बाण,आण आणि दिग्गज,धुरंधर,बुलुंद तोफ,बुलुंद आवाज तसेच कार्यसम्राट,कर्तबगार,कर्तृत्ववान, तडफदार,धडाकेबाज,विचारवंत,मार्गदर्शक,आधारस्तंभ असणारे सुद्धा ओबीसी सुतार समाजात नक्कीच असतील.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात समाज प्रभाव,प्रभूत्व,प्राबल्य,समाजात समाजप्रिय सुद्धा असतील समाजात वैयक्तिक पातळीवर कोण किती आर्थिक परिस्थितीने गर्भश्रीमंत,धनवान,धनाढ्य, प्रतिष्ठित,प्रतिभावंत आहेत याचा संबंध अजिबात येत नाही.समाजात सामाजिक श्रीमंती आणि वैयक्तिक श्रीमंती हे दोन्हीही विषय वेगवेगळे आहेत हे लक्षात घेणे गरजेचे असते.ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात मोठ्या रुबाबात आणि मोठ्या दिमाखात समाज नेतेगिरी करणाऱ्या समाज नेत्यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना ओबीसी समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमात,समाज जागृती मेळाव्यात,आंदोलन ठिकाणी,ओबीसी मोर्चात समाजात सहभागी करणे गरजेचेच आहे.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात पदांची निर्मिती करणे म्हणजे संबंधित पदाची कर्तव्याची आणि जबाबदारीची जाणिव करून देणारे एक महत्वाचे माध्यम असते.पदांची निर्मिती म्हणजे मान्यताप्राप्त,कर्तबगार, कर्तृत्ववान,कार्यसम्राट नेतृत्व होत नाही.समाजात नेतेगिरी करणारे आणि संघटना अध्यक्ष मान्यवरांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यात ओबीसी संदर्भात समाज जागृती मेळाव्याचे आयोजन करून लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करणार आहात काय?

समाजात लाखोंच्या संख्येने उद्योग व्यवसाय उभारणी करण्यात येईल काय आणि समाजाला संवैधानिक आधार व अधिकार असलेले राजकीय प्रतिनिधित्व सुध्दा मिळवून देणार आहात काय? समाजाला सत्य,वास्तव परिस्थिती समजण्यासाठी पारदर्शकपणे आपापल्या संघटनेच्याच वतीने जाहीर करावी. ओबीसी सुतार समाजात असे किती समाज मान्यवर खऱ्या समाज कसोटीवर उतरतील.सामाजिक,वैचारिक,नैतिक जबाबदारीचा विचार करता हे शिवधनुष्य पेलणे जमत नसेल तर मग म्हणावेसे वाटते कि,विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात विविध पदांची निर्मिती शोभेची वस्तू नसून विकासासाठी आणि प्रबोधनासाठी असतात.लिखाण समाज जागृती अभियान अंतर्गत.



**प्रमोद सूर्यवंशी :-८६०५५६९५२१.**
**चिखली,मातृतीर्थ बुलडाणा**

# शासनकर्ती जमात म्हणजे आदर्श कर्मचारी,प्रशासकीय अधिकारी?


जगात मानव जात संकटात आहे.त्याला मदत करण्यासाठी सकारात्मक विचारांची मानसिकता असणारे,माणस माणुसकी दाखविण्यासाठी पुढे येत आहे.मदत करण्यासाठी सरकारी कायदा कानून असले तरच मदत करावी अशी मानसिकता केवळ भारतात असू शकते.इतर प्रगत देशात तसी नाही. म्हणूनच इटली,रशिया, अमेरिका, जर्मनी, स्पेन, फ्रांस, चीन सर्व परदेशातील सरकारने सर्वांच्या बँक खात्यात वीस ते चोवीस हजार रुपये जमा केले. भारतात प्रत्येक माणसाला जात,धर्म,काम धंदा,प्रांत याचे प्रमाण पत्र दाखवावे लागते. उपासी आहात याचा पुरावा काय?. तो दाखवावा लागतो.

तुम्ही नांव नोंदणीकृत कामगार,मजूर आहात तरच अन्न धान्य आणि मदत करण्याच्या लायक आहात. असंघटित कष्टकरी कामगार मजूर यांच्या नांवाने पोट भरणारे बोगस लोकांच्या नांवाची यादी इमारत बांधकाम कामगार म्हणून अधिकृतरीत्या जाहीर होते. राज्याच्या एका मंत्रांनी एका जिल्ह्यात,तालुकात कामगार अधिकाऱ्याला बोलाऊन तालुक्यात किती कामगारांची नांव नोदणी झाली. हे विचारले असता त्याने दिलेली यादी पाहून मंत्री महोदयांनी हे कामगार कोण आहेत. गावात दाखवा सांगितले असता. बोलती बंद झाली. कोणी नांव दिले ते सांगा त्याचे उत्तर दिले गेले नाही.म्हणून ही नांव नोंदणी बोगस आहे हे ठरवून ताबडतोब इमारत बांधकाम कामगारांना सामानाची कीट वाटपाची योजना बंद केली होती. कारण राज्यात यांच्याच माणसाकडून मोठ्या प्रमाणात इमारत बांधकाम कामगारांची नांव नोंदणी झाली होती. मग प्रश्न्न निर्माण होतो.बाकी कामगार,मजुरांचे काय?. त्यांना उपवासी मरू देणार का ?.

खाजगीकरणामुळे बेरोजगारी आली कायमस्वरूपी मिळणारी नोकरी कंत्राटी पद्धतीने आल्यामुळे कंत्राटी कामगार म्हणून पगार कमी त्यात महागाई,सलूनमध्ये काम करणारे कामगार,किराणा दुकानात, कपड्याच्या दुकानात काम करणारे कामगार, टेलर काम करणारे कामगार,ग्ररेज वाले कारागीर,असे एक दोन नाही तर ९३ टक्के असंघटीत कामगार मजूर आहेत.त्यांना सरकार कशी मदत देणार आहे.त्या पेक्षा सरसकट जो भारतीय नागरिक आहे. ज्यांच्या कडे मतदान कार्ड आहे.आणि ज्याने मतदान केले आहे त्यालाच खरोखरच मदतीची गरज आहे.त्यांना मदत झाली पाहिजे.जे मतदान करत नाही. सर्वच राजकीय नेते चोर आहेत असे म्हणणारे जन्म मृत्यूचा, उत्पन्नाचा,जातीचा दाखला कोणाकडून घेतात.शेतीचा सातबारा,व गावातील घरचा आठ 'अ ' नमूना फॉर्म कोणाकडे भरतात.भारताचा नागरिक म्हणून नांव नोंदणी कोणाकडे करतात.तिथे हे राजकीय नेते नसतात तिथे शासनाचे प्रशासकीय कर्मचारी अधिकारी असतात.ते कोणाचे काम करतात?. त्यांना पगार कोण देतो?.

भारतात बेरोजगारी,महागाई मुळे गोरगरीब कष्टकरी मृत्यू मुखी पडणार नाहीत, तर सर्वांची रोजीरोटी बंद झाल्यामुळे उपासमारीची लागण झाल्यामुळे मृत्युमुखी पडतील ही भीती जास्त व्यक्त केली जात आहे. कारण संघटित कामगार असंघटित होत आहे. तो कंत्राटी पद्धतीने काम करतो त्याला कोणता ही नियम लावल्या जात नाही.ज्यांना घरदार,गांव नाही कुठेही मृत्यू मुखी पडले तर त्यांच्यासाठी कोणी रडणारे येणार नाहीत,पण माणुसकीची मानसिकता आणि सकारत्मक विचारधारा असणारे लोक लढण्यासाठी तुम्हाला कडक शिक्षा करण्यासाठी पुढे आल्या शिवाय राहणार नाहीत.

अमेरिका,ईटली,चिन व शेजारील राष्ट्राचे प्रमुख हताशपणे मानवी मृत्युच्या साखळीकडे पहात असुन




त्या शवाची विल्हेवाट लावण्यासाठी कामगार कर्मचारीवर्ग नाही म्हणून ते शोकाकुल अवस्थेत पाहत होते. आपल्या राष्ट्राचे प्रधानमंत्री,राज्याचे मुख्यमंत्री अशा गंभीर परिणामापासुन नागरिकांना दुर ठेवत घरी राहण्याचे आवाहन लॉकडाऊन करून काळजी घेत होते. शासन कर्ती जमात म्हणजे जिल्हास्तरीय जिल्हाप्रशासन,नगर प्रशासन,आरोग्य प्रशासन,पोलीस प्रशासन महानगरपालिका, नगरपालिका,नगरपरिषद,नगरपंचायतीसह ग्रामसेवक ग्रामपंचायत फक्त सरकारी कर्मचारी काळजी घेत आहे. खाजगीकरणाचे समर्थन करणारे कामगार कर्मचारी आणि तो समाज कुठे दिसला का पहा?.मग शासन कर्ती जमात कोणती होती?.

अशा परिस्थितीत गोर गरिब नागरिकांच्या खाण्या पिण्याचा प्रश्न्न निर्माण होतो. यासाठी शासनाने रेशन धान्य दुकानातून रेशन कार्ड धारकांना गहु तांदूळ याची व्यवस्था केली आहे. इतकेच नव्हे तर सकारत्मक विचारांच्या लोकांनी लोकांसाठी माणूसकीचे हात म्हणून नकळत मदतीसाठी पुढे येत होते. खंत मात्र इतकी की काहीजण निस्वार्थीपणे मदत करत होते, तर काहीजन उपकारच करित आहे अशा भावनेने तर काही जन फोटो व्हिडीओ वायरल करतांना दिसतात होते.व त्यातुन मिळविलेल्या लाईकवर खुष होत होते. तर काही लोक फोटो न टाकता गरजवंताच्या आम्ही कामी आलो म्हणुन मदत करून समाधानी होत होते. फोटो टाकणे म्हणजे त्यामागील उद्देश की यातुन इतरांनी प्रेरणा घेऊन मदत करावी.यातुन वाटते की काहीही असो संकटकाळी मदत तर दिली पाहिजे. आजच्या घडीला गरज भागणे खूप गरजेचे झाले आहे. म्हणुनच रेशनदुकानातुन वाटप होणारे अन्न धान्य कितपत लोकांना पुर्ण मिळते या दिले जाते यावर लक्ष देणे ही गरजेचे आहे. दुकानदार ग्राहकांना सांगतात की धान्य कमी आले आहे. यावेळेस हे घेवुन जा पुढच्या महिन्यात बघु.शासन परिपत्रकातुन,बातम्यातुन सांगते की इतके धान्य वाटप केले आहे.गहु तांदूळ,साखर परंतु गहु,तांदळाशिवाय बाकीचे मिळत नाही. तसेच रेशन दुकानातून पावती घ्या, अन्नधान्य असलेले फलक लावा परंतु अशा नियमांचे पालन करणारे एखादे ही दुकान पाहण्यात आले तर त्यांचे फोटो कडून सोशल मिडीयावर टाका. संबंधीत अधिकारी दुकानात जातात धान्य देतांना फोटो घेतात परंतु समोरच्याला धान्य किती दिले हे मात्र दुर्लक्षित करतात.रेशन कार्डधारकांची देखील रेशन दुकानदाराला विचारण्याची हिंमत होत नाही,कारण त्याला धान्य घ्यायचे असते.कालचे तांदुळ कार्डावर असलेल्या प्रत्येक सदस्यांना प्रत्येकी पाच किलो प्रमाणे होते परंतु तसे न मिळता काही दुकाने अपवाद वगळता काही दुकानातून दहा,पाच,पंधरा किलो असे तांदुळ देण्यात आले.ते ही दुकान दोन दिवसच उघडी ठेवलीत.वर्षानुवर्षे अशा रेशन कार्ड धारकांच्या हक्काचे गहु तांदुळ त्यांना दिले जात नाहीतच तर कमीतकमी संकटसमयी तरी माणुसकी म्हणुन त्यांचे मिळणारे धान्य तर प्रामाणिकपणाने त्यांना द्यावे. संबंधित अधिकारी यांनी ही अशा बाबी लक्षात घेऊन त्यांच्याकडे मोबाईल द्वारे,या समक्ष गेलेल्या माहितीनुसार त्या दुकानावर लक्ष देवुन कारवाई केली पाहिजे. आज पर्यन्त किती रेशन दुकानदारावर कारवाई करण्यात आली आहे?. परंतु असे काही दुकाने आहेत की त्यांच्या कडे चुकुनही अधिकारी बघत नाहीत त्या दुकानात जातात मात्र नावालाच. गोरगरिबांना अशाने न्याय कधी मिळणार?. अधिकारी यांनी नियमानुसार सदर दुकानात अन्नधान्य व भाव दर फलक,सदर मिळणारे धान्य,पावती देण्याची सक्ती व इतर बाबीचे निकस सूचना देणारे बोर्ड त्या दुकानात लावलेले पाहिजे. असे न दिसल्यास कारवाई करण्याचे कर्तव्य बजाविले पाहिजे. शासन कर्ती जमात म्हणजे इमानदारीने लोकांना सेवा देणारा आदर्श कर्मचारी अधिकारी असा, आदर निर्माण करा. रस्त्याने जाताना,कुठे ही भेटला तर लोकांनी आदरानी नमस्कार केला पाहिजे. त्यांच्या तोंडून गावरान शिवि नाही निघाली पाहिजे.तरच तुम्ही जीवनात काही तरी कमावले असे होईल. पैसा,सोने,चांदी, गाडी,बंगाल प्लॉट,जमीन जाग्यावरच राहणार आहे, शिल्लक राहील ती माणुसकी. म्हणुन संकटकाळी गोरगरिबांना त्यांच्या हक्काचे जे असेल ते त्यांना मिळवून द्या.

शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करा,बेरोजगारी,महागाई त्याच्या परीने आक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण शासन कर्ती जमात म्हणजे आदर्श कर्मचारी,अधिकार?. त्याविरोधात प्रामाणिकपणे लढत आहात.जर लोकांना योग्य सेवा दिली तर इतिहासत तुमचे नांव सुवर्ण अक्षराने लिहल्या जाईल.आणि कर्तव्यात कामचुकारपणा केला.तर इतिहासात नाही तर गावाच्या शहराच्या चौकात नांवाची चर्चा असेल.समोरून गेला तर एकाच वेळी अनेकांच्या तोंडातून कोणती शिवी निघेल ते सांगता येत नाही. म्हणूनच आज सरकारी नोकरीत आहात म्हणून लोक साहेब म्हणतात.उद्या नोकरी गेल्यावर कुत्रा म्हटले नाही पाहिजे.सरकारी कायदे काही असू द्या तुम्ही माणूस म्हणून माणुसकी दाखवा. पोलीस,डॉक्टर,नर्स पालिका कामगार कर्मचारी अधिकारी प्रामाणिक पणे कर्तव्यदक्ष पणे जनतेला सेवा देतात काय?. सीमेवर लढणाऱ्या सैनिकांना सुरक्षा कीट देण्यासाठी मोदींना पैसा व वेळ नाही. पण तिन्ही दलाच्या जवानाना आकाशातून त्यांच्यावर पुष्पवर्षाव करण्यासाठी वेळ आणि पैसा आहे.प्रसिद्धी साठी हा माणूस काय काय करणार आहे.शासन कर्ती जमात म्हणजे आदर्श कर्मचारी,अधिकारी यांनी याविरोधात संविधानाच्या चौकटीतून आवाज उचलणे आवश्यक आहे.शासन कर्ती जमात म्हणजे आदर्श कर्मचारी अधिकारी यांना जे संविधानिक अधिकार आहेत.ते मंत्री महोदयांना नाहीत.राजपत्रित अधिकारी संविधानिक अधिकारांचा संघटितपणे वापर करू शकतात. त्यासाठी सकारत्मक विचारांची मानसिकता दाखवणारी माणुसकी जिवंत असणे आवश्यक आहे. कोरोना महामारी पेक्षा,बेरोजगारी महागाई,शिक्षण आणि आरोग्य शोषणकारी झाले आहे. मोदी सरकारचे डोके ठिकाण्यावर आणणारी प्रशासकीय यंत्रणेची देशाला गरज आहे. देशात प्रिंट मीडिया चॅनल मीडिया गोदी मीडिया झाली आहे. पत्रकार संपादक जमात संपली आहे.म्हणूनच ते काम शासन कर्ती जमात म्हणजे आदर्श कर्मचारी,अधिकारीच करू शकतात. बलाढ्य सत्ता बदलून टाकण्याची ताकद प्रशासकीय यंत्रणेत आहे. हे नेहमी सिनेमात दाखविले जाते कधी सत्यात दाखवा. एक ती. एन शेषन,एक गो.रा खैरनार,एक तुकाराम मुंडे काय काय करू शकतो.ते ही २४ ते ७२ तासात.हीच सकारत्मक मानसिकता सर्वच उच्चशिक्षित उच्चपदस्थ कर्मचारी अधिकारी वर्गानी दाखवली तर काय होईल?. म्हणूनच शासनकर्ती जमात म्हणजे भारतीय संविधानाचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन काम करणार आदर्श कर्मचारी,अधिकारी आहे. त्यांनी आज चांगली देश सेवा केली तर उद्याचा चांगला आदर्श कर्मचारी,अधिकारी निर्माण होईल. तो तुमचा मुलगा,भाऊ ,काका,मामा, पुतण्या,भाचा,भावजी,साला कोणी तरी असेल. आजच्या शासनकर्ती जमातने उद्याचा विचार करावा.म्हणजे आदर्श कर्मचारी,अधिकारी प्रशासकीय यंत्रणा उभी राहील.सर्वच राजकीय नेते चोर आहेत. त्यांना साथ देणारे कामगार,कर्मचारी प्रशासकीय अधिकारी कोण आहेत?.



**सागर रामभाऊ तायडे**
-९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.

# एका शिक्षकाची लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या

**केज/प्रतिनिधी :** केज शहरात वास्तव्यास असलेल्या एका शिक्षकांनी मंगळवारी रात्री केज-कळंब रोडवरील चिंचोली फाट्या नजीक एका शेतकऱ्याच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.



प्राथमिक मिळालेल्या माहितीवरून सूर्यकांत बालासाहेब वाघमारे रा.लव्हुरी ह.मु. शाहूनगर केज वय ४१ वर्षे व्यवसाय शिक्षक, सूर्यकांत वाघमारे हे केज तालुक्यातील कुंबेफळ येथील सिद्धी विनायक विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत होते.

मंगळवार दिनांक ९ जून २०२६ रोजी रात्री ११-०० वाजण्याच्या पूर्वी केज-कळंब रोडवरील चिंचोली फाट्या नजीक एका शेतकऱ्याच्या शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. परंतु आत्महत्येचे नेमके कारण काय ते अद्यापही कळाले नाही. सदर घटनेची माहिती ही केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक निरीक्षक राजू वाघमारे व बीट अमलदार हेड कॉन्स्टेबल त्रिंबक सोपने घटनास्थळी हजर होत पंचनामा करून मृतदेह उत्तरनीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय केज येथे पाठवण्यात आला आहे.

सदरील घटनेचा पुढील तपास हा केज पोलीस हे करत आहेत. सूर्यकांत वाघमारे यांच्या पश्चात त्यांचे आई-वडील, तीन भाऊ व पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. सूर्यकांत वाघमारे हे मनमिळावू व प्रेमळ स्वभावाचे होते ते शहरात व परिसरात त्यांना मानणारा मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात असून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांचे उलखणीय कार्य असल्यामुळे त्यांचा मोठ्या प्रमाणात जनसंपर्क होता. सदर घटनेची माहिती ही केज शहरात व परिसरात कळताच सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे.

# किल्ले धारूरकरांचा वीज प्रश्नावर एल्गार , मागणी मान्य न झाल्यास उपोषणाचा इशारा



**किल्ले धारूर/प्रतिनिधी :** किल्ले धारूर शहरातील गंभीर अशी वीज समस्या निर्माण झाली आहे यामुळे शहरातील प्रत्येक नागरिक तसेच छोटे-मोठे व्यापारी हे देखील त्रस्त झालेले आहेत. शहरातील नागरिकांच्या वतीने यापूर्वीही निवेदन देण्यात आले होते व तोंडी देखील मागणी करण्यात आली होती.परंतु अद्यापपर्यंत कोणताही तोडगा निघाला नाही त्यामुळे शहरातील नागरिक आज प्रचंड आक्रमक होऊन नागरिकांनी मागणी पूर्ण करण्यासाठी महावितरणला निवेदन देण्यात आले.जर आमच्या मागण्यांची पूर्तता १५ दिवसात न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे.

किल्ले धारूर तालुका विकास संघर्ष समितीच्या वतीने महावितरणच्या कार्यकारी अभियंता यांना निवेदन देत १५ दिवसात १० एमव्हीए चे २ नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्याची मागणी केली. मागणी मान्य न झाल्यास समितीच्या वतीने उपोषणाचा इशारा देखील देण्यात आला आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांद्वारे स्थानिक आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्याशीही दूरध्वनीवरून चर्चा करून तातडीने प्रयत्न करण्याची मागणी करण्यात आली.

सदर निवेदनाची एक प्रत तहसीलदार साहेब धारूर व पोलिस निरीक्षक साहेब धारूर यांना देखील देण्यात आली या प्रसंगी किल्ले धारूर तालुका विकास संघर्ष समितीचे प्रा.नितेंद्र शुक्ला, संदीप भैया शिनगारे,सुनील कोमटवार, प्रशांत शिनगारे,योगेश अंधारे,दादा शेरकर, प्रवीण भैरे, कृष्णा महाजन, हनु अंधारे, ॲड. युवराज फुन्ने,संदीप खिलोजी,सचिन बैरागी,आप्पा गुळवे,रोहित फावडे,स्वप्नील धनवडे यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते....

# नेहरू मोदी तुलना शक्य नाही; इतिहास विसरू नका, शरद पवारांचा भाजपावर हल्लाबोल

मुंबई,१० जून (पीएसआय)

नेहरूंचा संघर्ष, स्वातंर्त्यलढ्यातील योगदान आणि देश उभारणीतली भूमिका लक्षात घेता त्यांची तुलना अन्य कोणाशीही करता येणार नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आज मुंबईतील आयोजित कार्यक्रमात पवार बोलत होते. यावेळी पवार यांनी नेहरू, गांधी घराणे आणि काँग्रेसच्या देशासाठीच्या योगदानाचा उल्लेख केला.

''पंतप्रधान होण्यापूर्वी नेहरूंनी इंग्रजांविरुद्धच्या स्वातंर्त्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अनेकवर्षे तुरुंगवास भोगला. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी संघर्ष केला. आज आपण स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत, त्यामागे नेहरूंचे मोठे योगदान आहे. हा इतिहास विसरता येणार नाही,'' असं शरद पवार म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत बोलताना पवार म्हणाले, ''पंतप्रधानपद हे देशातील सर्वोच्च संस्थात्मक पद आहे. त्या पदाची प्रतिष्ठा राखणे हे प्रत्येक

# बीड जिल्ह्याच्या लेकीने रचला इतिहास !; देशाचे नाव केले रोशन दोन गोल्ड मेडल आणले खेचून!

## वर्ल्ड योगासना चॅम्पियनशिप मध्ये जिवाचीवाडीच्या हिंदवी चौरेने जिंकले गोल्ड मेडल!



**केज/प्रतिनिधी :** ऊसतोड मजुराचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील जीवाचीवाडी या डोंगरदऱ्यात वसलेल्या जिवाचीवाडी या गावची हिंदवी परमेश्वर चौरे हिने वर्ल्ड योगासना चॅम्पियनशिप मध्ये डबल गोल्ड मेडल जिंकून देशाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविले आहे.

पहिल्या मेडल ट्रेडिशनल ग्रुप आणि दुसरा फॉरवर्ड बेल्डिंग अशा पद्धतीत पहिली विश्व योगासना चॅम्पियनशिप अहमदाबाद गुजरात या ठिकाणी पार पडली. यामध्ये हिंदवि चौरे हिने दोन गोल्ड मेडल जिंकले आहेत. ही स्पर्धा ४ जून ते ८ जून यादरम्यान अहमदाबाद गुजरात या ठिकाणी पार पडली.

यामध्ये योगासना भारताचे अध्यक्ष जयदीप आर्या आणि वर्ल्ड चॅम्पियन कॉम्पिटिशन डायरेक्टर डॉ. संजय मालपाणी यांनी तिला मेडल देऊन सन्मान केला.

यामुळे सर्वत्र हिंदवी चौरेचे कौतुक करण्यात येत आहे तसेच बीड जिल्ह्यातुन व जिवाचीवाडी गावातून आपल्या गावच्या लेकीचा देश पातळीवर सन्मान झाल्याने हिंदवी चे अभिनंदन होत आहे. ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्यातून हिंदवी चौरे ही सर्व साधारण घरची कन्या आज तिने देशातच नव्हे तर जगात नावलौकिक केले आहे. आज ज्या बीड जिल्ह्याला ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून हिणवले जात होते. आज याच जिल्ह्यामधून तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी तसेच क्रिकेट संघात या जिल्ह्याचे भूमिपुत्रांनी नावलौकिक केलेले आहे. याच धरतीवर बीड जिल्ह्याची कन्या हिंदवी चौरे हिने आपले नाव जागतिक स्तरावरील स्पर्धेचे गोल्ड मेडल घेऊन उज्वल केले आहे. यामुळे बीड जिल्हा आता ऊसतोड कामगारांचा नसून अधिकारी व जागतिक खेळाडूंचा पण जिल्हा आहे हे हिंदवी चौरे हिने आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे.

# साकोळच्या शिक्षिका अनुसया घोलप यांना उत्कृष्ट साने गुरुजी बालभवन आदर्श शिक्षक पुरस्कार




**पुणे/प्रतिनिधी :** राष्ट्र सेवा दल, साने गुरुजी स्मारक, पुणे यांच्या वतीने महामानव ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त दिनांक ४ जून २०२६ रोजी आयोजित विशेष कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील पी. एम. श्री प्रशाला साकोळ (ता. शिरूर अनंतपाळ) येथील शिक्षिका श्रीमती अनुसया दत्तात्रय घोलप (शिंदे) यांना 'उत्कृष्ट साने गुरुजी बालभवन आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या मार्गदर्शक डॉ. शैलाताई नरेंद्र दाभोलकर, माजी आमदार कपिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. अजित शिंदे, शिक्षक भारतीचे राज्याध्यक्ष मा. नवनाथ गेंड आणि मा. प्रवीण अनिल शिंदे हेही या प्रसंगी उपस्थित होते.

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल श्रीमती घोलप यांना हा बहुमान देण्यात आला. साने गुरुजींच्या विचारांचा वारसा जपत बालकांमध्ये संस्कार, सामाजिक जाणीव आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याच्या त्यांच्या कार्याची या निमित्ताने दखल घेण्यात आली.

या पुरस्कारामुळे विविध स्तरांतून श्रीमती घोलप यांचे अभिनंदन होत आहे.

## दौंड तालुक्यातील ४०० गुऱ्हाळघरे बंद, अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईमुळे गुऱ्हाळ मालकांचे धाबे दणाणले

दौंड रू तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचा धसका अनेकांनी घेतला असून अनेक दुकाने आणि व्यवसाय कारवाईच्या भीतीने बंद असल्याचं चित्र सध्या दिसून येत आहे. अन्न औषध प्रशासनाच्या छापेमारीमुळे भेसळ असलेला गूळ तयार करणारे परप्रांतीय गुऱ्हाळ चालक धास्तावले आहेत. तसेच गावठी आणि हातभट्टीच्या दारूसाठी लागणारा गूळ हा गुऱ्हाळांमधून पुरवला जात असल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाने गुऱ्हाळ मालकांना नोटीसा दिल्या आहेत. यामुळे दौंड तालुक्यातील जवळपास ४०० गुऱ्हाळे सध्या बंद असल्याचे चित्र दिसत आहे. तर दुसरीकडे भेसळयुक्त गूळ निर्मिती उद्योगावर कारवाई करण्यात येत असल्याने नागरिकांकडून या कारवाईचे स्वागत करण्यात येत आहे.

# लातूर एमआयटीत बालरोग विभागाची प्रगत व मुलभूत जीवनरक्षण प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाच्या बालरोगशास्त्र विभागातर्फे भारतीय बालरोग संघटना (इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स) अंतर्गत तीन दिवसीय प्रगत जीवनरक्षण प्रणाली (ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट) आणि मुलभूत जीवनरक्षण प्रणाली (बेसिक लाईफ सपोर्ट) प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली.

एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालय परिसर समन्वयक श्री. पृथ्वीराजदादा कराड, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार यांच्या सहकार्य व प्रोत्साहनातून वैद्यकीय महाविद्यालयातील सुसज्ज कौशल्य प्रयोगशाळा (स्किल लॅब) येथे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण कार्यशाळेचा शुभारंभ वैद्यकीय महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा आणि शैक्षणिक प्रकल्प संचालिका डॉ. सरिता मंत्री यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. सुरेश भट्टड, लातूर आयएपीचे सचिव डॉ. किरण होळीकर व कोषाध्यक्ष डॉ. मंगेश डाके यांच्यासह बालरोग विभागातील विभाग प्रमुख, संबंधित सर्व डॉक्टर्स यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यशाळेत डॉ. भावेश शहा मिरज यांच्या नेतृत्वाखाली डॉ. दीपिका माशळकर लातूर, डॉ. उदय राजपूत सातारा, डॉ. अमोल गिरवलकर कोल्हापूर, डॉ. नरेश सोनकावडे ठाणे, डॉ. राहुल डावरे पुणे, डॉ. विनोद इंगळे छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. संगीता चिवळे पुणे या राज्यभरातील तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

लातूर एमआयटीच्या बालरोगशास्त्र विभाग प्रमुख तथा लातूर आयएपीच्या अध्यक्षा डॉ. विद्यादेवी कांदे यांच्या पुढाकारातून आणि डॉ. दीपिका माशळकर यांच्या संकल्पनेतून व समन्वयातून कार्यशाळेचा उपक्रम राबविण्यात आला. तर डॉ. शीतल भट्टड आणि डॉ. विशाखा पडिले यांनी स्थानिक पातळीवरील नियोजनात मोलाची मदत केली.

या तीन दिवसीय कार्यशाळेत आजारी बालकांमधील गंभीर लक्षणे ओळखणे, आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करणे तसेच तातडीच्या उपचारांची प्रात्यक्षिकांसह (हँड्स-ऑन) सखोल प्रशिक्षण देण्यात आले. मर्यादित जागा असलेल्या या कार्यशाळेत राज्यभरातून आलेल्या ३८ डॉक्टरांनी सहभाग घेतला होता.

बालरोग क्षेत्रातील आपत्कालीन वैद्यकीय उपचारांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि डॉक्टरांचे कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे संस्थेच्या व्यवस्थापनाचे, प्रशासनाचे आणि सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान असून, आयोजक समितीने सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमाबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून आणि आयएपी सदस्यांकडून आयोजक समितीचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# सोयाबीन पिकांमध्ये बीज प्रक्रिया महत्त्वाची-सागर पठाडे

**केज/प्रतिनिधी :** खरीप हंगामातील पेरण्या सुरू झाल्या असून सोयाबीनसह सर्व पिकांच्या बियाण्यांवर बीजप्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी केले. तालुका कृषी कार्यालय व आत्मा, केज यांच्या वतीने साळेगाव येथील नंदी केदारेश्वर शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये सोयाबीन पिकासाठी बीजप्रक्रियेविषयी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना बीजप्रक्रियेचे महत्त्व पटवून देण्यात आले. रासायनिक बीजप्रक्रियेचे प्रात्यक्षिक अमोल सोनवणे यांनी सादर केले. मार्गदर्शन करताना सागर पठाडे म्हणाले की, शेतकरी पेरणीवेळी बीजप्रक्रियेकडे अनेकदा दुर्लक्ष करतात. मात्र, ही छोटी वाटणारी प्रक्रिया




भविष्यातील कीड व रोगांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरते. बीजप्रक्रियेमुळे बुरशीजन्य रोगांवर नियंत्रण मिळते, जमिनीतून व बियाण्यांद्वारे पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो, बियाण्यांची उगवण क्षमता वाढते तसेच रोपे सशक्त व जोमदार वाढतात. परिणामी पिकांच्या उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांना अधिक फायदा मिळतो. कमी खर्चात होणारी ही रोग व कीड नियंत्रणाची किफायतशीर पद्धत असल्याचे त्यांनी सांगितले.

रासायनिक बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करताना प्रति किलो बियाण्यास साधारणतः ३ ग्रॅम थायरम किंवा ३ ते ४ ग्रॅम कार्बेन्डाझीम वापरण्याची शिफारस करण्यात आली. थायरम वापरताना त्वचेची खाज किंवा डोळे लाल होण्याची शक्यता असल्याने रबरी किंवा प्लास्टिकचे हातमोजे वापरण्याचे आवाहन करण्यात आले.

बीजप्रक्रियेचा योग्य क्रम स्पष्ट करताना प्रथम रासायनिक बुरशीनाशकाची प्रक्रिया करावी, त्यानंतर ३ ते ४ तासांनी रायझोबियमची प्रक्रिया करावी. रायझोबियम पावडर असल्यास २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे किंवा लिक्विड स्वरूपात असल्यास ५ मिली प्रति किलो बियाणे वापरावे. शेवटी पी.एस.बी.ची बीजप्रक्रिया करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास दरेकर मंडळ कृषी अधिकारी, युसूफ वडगाव, नागेश येवले (उपकृषी अधिकारी), योगेश पाटील (आत्मा), सुदर्शन शेळके (कृषी सहाय्यक), अवी महाजन (संचालक, नंदी केदारेश्वर एफपीओ), सुनील गालफाडे (पोलीस पाटील), अतुल जाधव (रोजगार सेवक) यांच्यासह भागवत मुळे, रोहित मुळे, अभिजित गिते, विठ्ठल टोपे, अशोक टोपे, सतीश जाधव आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाबासाहेब (उर्फ) पवन कांबळे सेलूकर यांची रेणापूर उपविभागीय दक्षता व नियंत्रण समितीच्या सदस्यपदी नियुक्ती

**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व वंचित घटकांच्या हक्कांसाठी गेली अनेक वर्षे सातत्याने कार्यरत असलेले सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब (उर्फ) पवन बाळू कांबळे (सेलूकर) यांची अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत कार्यरत असलेल्या रेणापूर उपविभागीय दक्षता व नियंत्रण समितीच्या अशासकीय सदस्यपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

प्राप्त माहितीनुसार, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार तसेच नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीसचे महाराष्ट्र राज्य सचिव वैभवजी गीते यांच्या शिफारशीवरून ही नियुक्ती करण्यात आली आहे. पवन कांबळे यांनी सामाजिक न्याय, मानवाधिकार, दलित अत्याचारग्रस्तांना न्याय मिळवून देणे, शासकीय योजनांची जनजागृती करणे आणि वंचित समाजघटकांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने लढा देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

रेणापूर उपविभागीय दक्षता व नियंत्रण समिती ही अनुसूचित जाती-जमातींवरील अत्याचाराच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, पीडितांना तात्काळ मदत व न्याय मिळवून देणे, तसेच अत्याचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे यासाठी कार्यरत असते. समितीच्या अशासकीय सदस्य म्हणून पवन कांबळे यांचा अनुभव आणि सामाजिक कार्याचा वारसा समितीच्या कामकाजाला अधिक बळकटी देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या नियुक्तीबद्दल नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस, लातूरचे पदाधिकारी, विशेष सरकारी वकील प्रेमनाथ देडे, सोमनाथ ढगे, संजय माकेगावकर, दिलीप आदमाने, रानबा वारकरी यांच्यासह विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी प्रतिक्रिया व्यक्त करताना पवन कांबळे म्हणाले की, ''अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक



कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश व निर्देशांचे काटेकोर पालन, तसेच अत्याचारग्रस्तांना त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी समितीमार्फत ठोस आणि परिणामकारक पावले उचलली जातील. समाजातील दुर्बल घटकांवरील अन्याय, अत्याचार आणि भेदभाव रोखण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, कायद्याच्या चौकटीत राहून पीडितांच्या संरक्षणासाठी आणि न्यायासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू.''

पवन कांबळे यांच्या या नियुक्तीमुळे रेणापूर उपविभागातील अनुसूचित जाती-जमाती समाजाच्या न्याय व हक्क संरक्षणाच्या लढ्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच त्यांच्या माध्यमातून अत्याचारग्रस्तांना न्याय मिळवून देण्याच्या प्रक्रियेला अधिक गती मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात येत आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक

**लातूर/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या, परंतु समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविली जात असून, या शैक्षणिक वर्षापासून योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रथम शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असून, शालेय अभ्यासक्रमासाठी ३० जूनपर्यंत, तर अकरावी, बारावी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज सादर करावयाचे आहेत.

गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, अशाच विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेसाठी पात्र ठरविले जाईल; मात्र जे विद्यार्थी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणार नाहीत, त्यांना वसतिगृह किंवा स्वाधार या दोन्हीपैकी कोणतीही योजना मिळणार नाही. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहे नाहीत, तेथे हा नियम शिथिल असला तरी, भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करून ठेवावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## खरीप हंगाम २०२६ : कापूस व कडधान्य पीक प्रात्यक्षिकांसाठी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर विभागातील शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' आणि 'केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान' अंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रातील सहकारी संस्थांनी 'महाडीबीटी' प्रणालीवर त्वरित ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन लातूर विभागीय कृषी सहसंचालक महेशकुमार तिर्थकर यांनी केले आहे.

सुधारित वाणांचे दर्जेदार बियाणे, जैविक खते, कीटकनाशके आणि बीजप्रक्रिया औषधी इत्यादी निविष्ठांचा पुरवठा करून १० हेक्टर (२५ एकर) क्षेत्रावर आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी हे अभियान राबविले जात आहे. सन २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' असल्याने, निवड होणाऱ्या एकूण लाभार्थ्यांपैकी किमान ३० टक्के महिला शेतकरी असणे बंधनकारक आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत नोंदणीकृत असलेले शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी सहकारी संस्था अर्ज करण्यास पात्र आहेत. ज्यांनी मागील दोन वर्षांत या योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांना यावर्षी लाभ मिळणार नाही. तसेच, शेतकरी गट किंवा कंपनीमधील केवळ 'फार्मर आयडी' असलेले सदस्यच पात्र असतील.

इच्छुक संस्थांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावा. अर्जासाठी जवळचे सेतू केंद्र, सीएससी केंद्र किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधता येईल. अर्जांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाणार असल्याने, पात्र संस्थांनी लवकरात लवकर अर्ज सादर करावेत. लातूर विभागातील लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांतील पात्र शेतकरी गटांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

## खरीप हंगाम २०२६: राष्ट्रीय खाद्यतेल अभियान, प्रमाणित बियाणे पुरवठ्यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी आणि सहकारी संस्थांकडून अर्ज मागविले

**लातूर/प्रतिनिधी :** खरीप हंगाम २०२६ मध्ये राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया योजनेचा लाभ जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी लातूर जिल्हा कृषी विभागाने पात्र इच्छुक शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांकडून प्रमाणित बियाणे पुरवठादार संस्था म्हणून अर्ज मागवण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व संबंधित संस्थांनी आपले अर्ज १२ जून २०२६ पर्यंत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, लातूर येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत प्रामुख्याने सोयाबीन आणि इतर तेलबियांच्या प्रमाणित बियाण्यांचे वितरण केले जाणार आहे. यामध्ये ०५ वर्षांच्या आतील अधिसूचित वाण आणि ५ ते ८ वर्षांच्या आतील अधिसूचित वाण या बियाणांचा समावेश राहील. बियाणे पुरवठादार संस्था म्हणून इच्छुक संस्थेची साथी पोर्टलवर नोंदणी झालेली असणे अनिवार्य आहे. बियाण्याची गुणवत्ता, शिफारस, उत्पादन कालावधी, बियाणे उत्पादकांची नोंदणी, तसेच प्रचलित बियाणे कायदे, नियम व इतर विहित अटींची पूर्तता करणारी संस्था असावी. गुणवत्ता आणि उगवणक्षमतेची हमी असलेल्या अधिसूचित वाणांच्या (०५ वर्षांच्या आतील तसेच ५ ते ८ वर्षांच्या आतील) प्रमाणित बियाण्यांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. बियाण्यांचा पुरवठा तालुकास्तरावर केला जाणार असल्याने, संबंधित संस्थेकडे प्रत्येक तालुकानिहाय अधिकृत वितरक असणे आवश्यक आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# लातूर जिल्ह्यात खत आणि बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध

### साठेबाजी किंवा लिंकिंग करणाऱ्या विक्रेत्यांवर होणार सक्त कारवाई!

**लातूर/प्रतिनिधी :**सध्या जिल्ह्यात खरीप हंगामाची पूर्वतयारी वेगाने सुरू असून शेतकऱ्यांची खत व बियाणे खरेदी करण्यासाठी लगबग सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, लातूर जिल्ह्यामध्ये पुरेशा प्रमाणात खत आणि बियाण्यांचा साठा उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांनी कोणतीही धावपळ करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे. जमिनीमध्ये ८० ते १०० मि.मी. पाऊस पडून पुरेशा प्रमाणात ओलावा तयार झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी करू नये, तसेच खत खरेदी करताना केवळ एका विशिष्ट खताच्या ग्रेडचाच आग्रह धरू नये, असेही त्यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी खते व बियाण्यांची विक्री छापील किमतीपेक्षा (एमआरपी) जास्त दराने करू नये, तसेच खत किंवा बियाण्यांसोबत इतर नको असलेल्या निविष्ठांची सक्तीने विक्री (लिंकिंग) करू नये. खताचा साठा उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना देण्यास टाळाटाळ केल्यास किंवा बेकायदेशीर साठेबाजी केल्यास संबंधित विक्रेत्यांवर तात्काळ व सक्त कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

लातूर जिल्ह्यासाठी मे २०२६ अखेर एकूण २७ हजार ५७४ मे. टन रासायनिक खत आवंटन मंजूर होते, ज्याच्या तुलनेत २९ हजार ४१९ मे. टन एवढा पुरवठा झालेला आहे. मार्च २०२६ अखेरचा शिल्लक साठा धरून आजमितीस जिल्ह्यात एकूण ६५ हजार ३७५ मे. टन खत साठा उपलब्ध आहे. यामध्ये युरियाचा ८ हजार २५६ मे. टन पुरवठा झाला असून ९ हजार ७७९ मे. टन साठा उपलब्ध आहे. डी.ए.पी. चा २ हजार ३१ मे. टन पुरवठा झाला असून ४ हजार ९९३ मे. टन साठा उपलब्ध आहे. संयुक्त खतांचा १२ हजार ९८ मे. टन पुरवठा झाला असून ३५ हजार ४६१ मे. टन साठा उपलब्ध आहे. एस.एस.पी. चा ६ हजार ८३४ मे. टन पुरवठा झाला असून १४ हजार २५३ मे. टन साठा उपलब्ध आहे, तर एम.ओ.पी. चा २०० मे. टन पुरवठा मंजूर झाला असून ८९० मे. टन साठा सद्यस्थितीत उपलब्ध आहे.

जिल्ह्यात पीकनिहाय पेरणी क्षेत्राच्या प्रमाणात बियाण्यांची उपलब्धता देखील पुरेशी आहे. बियाणे आणि खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हा परिषद मोहीम अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा भरारी पथकाची स्थापना करण्यात आली असून, हे पथक तक्रार प्राप्त होणाऱ्या कृषी सेवा केंद्रांची तात्काळ तपासणी करून कठोर कारवाई करत आहे. याशिवाय तालुकानिहाय गुण नियंत्रण निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली असून, ते नियमित तपासणी करून त्रुटी आढळणाऱ्या केंद्रांवर कायदेशीर कारवाई करत आहेत.

शेतकऱ्यांना प्रत्येक कृषी सेवा केंद्रातील उपलब्ध खत साठ्याची अचूक माहिती मिळावी, यासाठी कृषी विभाग आणि जिल्हा परिषदेमार्फत विशेष ब्लॉग https://adozplatur.blogspot.com/p/box-sizing-border-box-margin-0-padding.html?m=1 आणि क्यूआर कोडची निर्मिती करण्यात आली आहे. खत व बियाण्यांच्या बाबतीत कोणतीही तक्रार, अडवणूक किंवा फसवणूक होत असल्यास शेतकऱ्यांनी तात्काळ आपल्या नजीकच्या कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## मेटा भारतात आपले पहिले एआय डेटा सेंटर सुरु करणार; रिलायन्स इंडस्ट्रीजसोबत भागीदारी

**मुंबई/प्रतिनिधी :** फेसबुकची मूळ कंपनी, मेटा, भारतात आपले पहिले आर्टिफिशियल इंटेलिजन्स डेटा सेंटर सुरू करणार आहे. यासाठी मेटाने रिलायन्स इंडस्ट्रीजसोबत भागीदारी केली असून, हे डेटा सेंटर गुजरातच्या जामनगर येथे उभारलं जाईल. रिलायन्स इंडस्ट्रीज जामनगरमध्ये हे केंद्र उभारणार असून, त्यानंतर मेटा तेथे आपले कामकाज सुरू करेल. हे एआय डेटा सेंटर भारताच्या एआय मोहिमेला चालना देईल.मेटा आणि रिलायन्सच्या भागीदारीतून उभारण्यात येत असलेल्या या एआय डेटा सेंटरची क्षमता सुरुवातीला १६८ मेगावॅट असेल. नंतर त्यात विस्तार केला जाईल. वृत्तानुसार, हे केंद्र पुढील दोन वर्षात कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

## जून महिन्याची वेतन देयके नवीन प्रणालीद्वारेच; लातूर कोषागार कार्यालयातर्फे आज नवीन सेवार्थ प्रणालीचे उजळणी प्रशिक्षण

**लातूर/प्रतिनिधी :** शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहे जून-२०२६ ची वेतन देयके आता नवीन सेवार्थ प्रणालीद्वारेच तयार केली जाणार आहेत. या प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये यासाठी लातूर कोषागार कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी आणि वेतनविषयक कामकाज पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी गुरुवार, ११ जून २०२६ रोजी एका विशेष उजळणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या सूचनेनुसार जून २०२६ पासून सर्व वेतन देयके नवीन सेवार्थ प्रणालीद्वारेच संकलित करून, ऑनलाईन पद्धतीने ई-स्वाक्षरीसह कोषागारात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रणालीबाबत यापूर्वी १० मार्च २०२६ रोजी प्राथमिक प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यानुसार अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांचा डेटा क्लीनिंग व अद्ययावतीकरणाचे काम पूर्ण करणे अपेक्षित होते. आता प्रत्यक्ष नवीन प्रणालीतून वेतन काढण्यापूर्वी कामकाज सुरळीत व्हावे, यासाठी हे उजळणी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

उपस्थिती अनिवार्य; पुन्हा प्रशिक्षण नाही

या प्रशिक्षणास सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन देयकांशी संबंधित कामकाज पाहणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. हे प्रशिक्षण पुन्हा आयोजित केले जाणार नसल्याने कोणीही अनुपस्थित राहू नये, असे जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

असे असेल प्रशिक्षणाचे वेळापत्रक

हे प्रशिक्षण लातूर येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील डीपीडीसी हॉल येथे दोन सत्रांत पार पडणार आहे. पहिल्या सत्रात सकाळी ११:३० ते दुपारी १ दरम्यान जिल्ह्यातील सर्व उपकोषागार कार्यालय स्तरावरील आहरण व संवितरण अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी, तर दुसऱ्या सत्रात दुपारी ३:३० ते सायंकाळी ५ दरम्यान लातूर कोषागार कार्यालय मुख्यालय स्तरावरील अधिनस्त सर्व आहरण व संवितरण अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण होईल. प्रशिक्षण ठरलेल्या वेळेवरच सुरू होणार असल्याने सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरच्या कोषागार अधिकारी डॉ. उज्वला भा. पाटील यांनी केले आहे.

## महागाईच्या काळात दिलासा! पुण्यात ५ रुपयांत आरोग्यसेवा देणारा फिरता दवाखाना

**पुणे/प्रतिनिधी :** सध्या सर्वत्र महागाई वाढत असून सर्वसामान्य नागरिकांना त्याचे चटके बसताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत माणसाच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजे आरोग्य. मात्र, आरोग्यसेवा दिवसेंदिवस महाग होत चालली आहे. याच पार्श्वभूमीवर रुग्णांच्या न्याय हक्कांसाठी कार्य करणाऱ्या रुग्ण हक्क परिषदेतर्फे अवघ्या ५ रुपयांत 'पृथ्वी मोबाईल क्लिनिक' (झीगूप्न श्दंगत ण्त्हग्म) हा फिरता दवाखाना सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, एका वर्षात तब्बल ७० हजारांहून अधिक नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला आहे.

केवळ ५ रुपयांत तपासणी केली जाते : सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. 'पृथ्वी मोबाईल क्लिनिक'च्या माध्यमातून पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील विविध वस्त्या आणि कामगार वसाहतींमध्ये जाऊन आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. या शिबिरांमध्ये केवळ ५ रुपयांत तपासणी केली जाते आणि मोफत औषधोपचारही उपलब्ध करून दिले जातात.

# 'पोलीस आपल्या सोसायटीमध्ये' उपक्रमाची लातूर जिल्ह्यात सुरुवात

### शहरी नागरिकांच्या समस्या आता त्यांच्या दारात जाऊन सोडवणार; १० पोलीस ठाण्यांकडून ३१९ सोसायट्यांना भेटी

**लातूर/प्रतिनिधी :** लोकाभिमुख, संवेदनशील आणि नागरिककेंद्रित पोलीसिंगची संकल्पना प्रत्यक्षात उतरवत लातूर जिल्हा पोलीस दलाने आणखी एक अभिनव पाऊल उचलले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्या त्यांच्या बांधावर जाऊन जाणून घेण्यासाठी राबविण्यात आलेल्या ''पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर'' या उपक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशांवर आता शहरी भागातील नागरिकांसाठी ''पोलीस आपल्या सोसायटीमध्ये'' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येणार आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने दि. १५ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ या दीड महिन्यांच्या कालावधीत हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील विविध शहरांमधील निवासी सोसायट्या, कॉलन्या आणि नागरी वसाहतींमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला जाणार आहे. या माध्यमातून नागरिकांच्या समस्या, तक्रारी, सूचना आणि अपेक्षा जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

काही दिवसांपूर्वी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेवरून लातूर जिल्हा पोलीस दलाने ''पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर'' हा उपक्रम राबविला होता. या उपक्रमाअंतर्गत पोलीस अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले होते. शेतीचे रस्ते, शेतजमिनीचे वाद, पाणी वाटप, अतिक्रमण, शेजारील वाद तसेच कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित विविध प्रश्नांवर चर्चा करून अनेक समस्या जागेवरच मार्गी लावण्यात आल्या होत्या. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये पोलीस दलाविषयी विश्वास वाढला असून नागरिकाभिमुख पोलीसिंगचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण झाले होते.

याच संकल्पनेचा विस्तार करत आता शहरी भागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित समस्या जाणून घेण्यासाठी पोलीस अधिकारी थेट सोसायट्यांमध्ये जाणार आहेत. वाढती गुन्हेगारी, महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न, ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, सायबर फसवणूक, वाहतूक समस्या, पार्किंगची अडचण, ध्वनीप्रदूषण, अंमली पदार्थांविषयी जागरूकता, शेजारील वाद, घरफोडी प्रतिबंध तसेच इतर कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित विषयांवर नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला जाणार आहे.

या उपक्रमात लातूर जिल्ह्यातील १० पोलीस ठाण्यांचा सहभाग असून एकूण ३१९ ठिकाणी भेटी आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पुढीलप्रमाणे भेटी होणार आहेत :

- उदगीर शहर पोलीस ठाणे ३३ ठिकाणे
- गांधी चौक पोलीस ठाणे ३१ ठिकाणे
- विवेकानंद चौक पोलीस ठाणे २६ ठिकाणे
- शिवाजीनगर पोलीस ठाणे ३१ ठिकाणे
- एमआयडीसी पोलीस ठाणे २६ ठिकाणे
- अहमदपूर पोलीस ठाणे ४६ ठिकाणे
- औसा पोलीस ठाणे ४० ठिकाणे
- निलंगा पोलीस ठाणे २६ ठिकाणे
- उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे २९ ठिकाणे
- चाकूर पोलीस ठाणे ३१ ठिकाणे



या भेटीदरम्यान नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्याबरोबरच त्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधला जाणार आहे. तसेच सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक, महिलांविरुद्ध होणारे गुन्हे, ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन आणि सामाजिक सलोखा याबाबतही जनजागृती करण्यात येणार आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाचा हा उपक्रम पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा ठरणार असून लोकसहभागातून सुरक्षित, शांततापूर्ण आणि गुन्हेमुक्त समाज निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. नागरिकांच्या समस्या त्यांच्या दारात जाऊन ऐकून घेणारे आणि त्या सोडविण्यासाठी पुढाकार घेणारे पोलीस प्रशासन हीच खरी लोकाभिमुख पोलीसिंगची ओळख असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित होत आहे.

जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी जनता पोलीस ठाण्यात येण्याची वाट पाहण्याऐवजी पोलीसच आता नागरिकांच्या दारात जाणार आहेत, हा संदेश या अभिनव उपक्रमातून देण्यात येत आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.